जा.क्र.पोअ/पोकनि/गृहसंकुल/१७९२/२०१७
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय ठाणे ग्रामीण
दिनांक- १३/१०/२०१७

विषय :- पोलीस कर्मचा-यांकरीता स्वतःच्या मालकीची घरांकरीता गृहनिर्माण सहकारी संस्था तयार करणेबाबत...

*****

**परिपत्रक-**

पुणे, नाशिक, मुंबई, नागपूर व ठाणे या ठिकाणी उभारण्यात आलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या गृहनिर्माण सहकारी संस्थाच्या धर्तीवर ठाणे ग्रामीण जिल्हयातील पोलीस कर्मचा-यांना (सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई) स्वतःच्या मालकीची हक्काची घरे मार्केट मधील किंमतीपेक्षा वाजवी किंमतीत मिळण्याकरीता मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र यांनी त्यांचेकडील दि.२९.०९.२०१७ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सुचनावजा आदेश दिलेले आहेत. ठाणे ग्रामीण जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील मिरारोड/शहापूर/टिटवाळा या शहरांमध्ये शिक्षणाच्या वैद्यकीय सेवेच्या सुविधा असल्याने तसेच स्वच्छ नागरी सेवा व महत्त्वाचे म्हणजे सदरची शहरे मुंबई, नवी मुंबई व ठाणे या मोठया शहरांना जोडली गेलेली आहेत. वाहतुकीच्या सुविधांमध्ये मोठया प्रमाणात सुधारणा व वाढ झालेली असल्याने पोलीस कर्मचा-यांना सदर शहरांमधून त्यांच्या कामाच्या ठिकाण पोहचण्यासाठी जास्त अडचण येणार नाहीत. त्याकरीता ठाणे ग्रामीण जिल्हयातील पोलीस कर्मचारी यांना स्वतःच्या मालकीची हक्काची घरे वाजवी किंमतीत ते सेवेत कार्यरत असताना मिळण्याच्या हेतूने व सेवानिवृत्त नंतर देखील त्यांना सोई-सुविधायुक्त स्वतःच्या मालकीच्या घरांमध्ये राहता येईल.

त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे दोन पर्यायांचा विचार करण्यात येत असून पोलीस कर्मचारी यांना स्वतःच्या मालकीची घरे देण्याकरीता बृहन्मुंबई पोलीस दलाच्या वतीने पनवेल, नवी मुंबई येथे उभारण्यात येणा-या पोलीस गृहनिर्माण संस्थेच्या धर्तीवर पोलीस कर्मचा-यांची गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या प्रचलित कायद्यानुसार सहकारी संस्था स्थापन करुन त्या सहकारी संस्थेमार्फत शासनाकडून अथवा खाजगी मालकांकडून जमीन खरेदी करुन त्या जमिनीवर सदर गृहनिर्माण संस्थेच्या मार्फतीने संकुल बांधणे.

पर्याय २ मिरारोड/शहापूर/टिटवाळा/बदलापूर या सारख्या व इतर क्षेत्रात विकास झालेल्या शहरांमध्ये बांधकाम व्यावसायिकांकडून सुरु असलेल्या बांधकामामधील किंवा बांधून पुर्ण झालेल्या संकुलामध्ये असलेले फ्लॅट संबंधित बिल्डरकडून बाजारभावापेक्षा कमी किंमतीत पोलीस कर्मचारी यांचेसाठी उपलब्ध करुन देणे. वरील दोन्ही पर्यायासाठी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी/सर्व शाखा प्रमुख/विभाग यांनी त्यांचे नेमणूकीतील इच्छुक पोलीस कर्मचारी यांचेकडून खालील नमुन्यात माहिती भरुन घेवून या कार्यालयास पोलीस कल्याण शाखा येथे दि.३१.१०.२०१७ रोजी पर्यंत सादर करावेत.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव व हुद्दा | नेमणूक | मोबईल क्रमांक | कोणत्या ठिकाणी घर घेण्यास इच्छुक आहेत. | गृहनिर्माण संस्थेमार्फत अथवा बिल्डरमार्फत तयार घेण्यास इच्छुक | अंदाजे किती चौ.फुटांचे घर घेण्यास इच्छुक आहे | नमुद ठिकाणनुसार अंदाजे किती रक्कमेपर्यंत घेण्यास इच्छुक आहेत. | अपेक्षित सोई-सुविधा (Amenities) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

**पर्याय क्र.१ करीता उदाहरण स्वरुप खालीलप्रमाणे भरलेला फॉर्म .**

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव व हुद्दा | नेमणूक | मोबईल क्रमांक | कोणत्या ठिकाणी घर घेण्यास इच्छुक आहेत. | गृहनिर्माण संस्थेमार्फत अथवा बिल्डरमार्फत तयार घेण्यास इच्छुक | अंदाजे किती चौ.फुटांचे घर घेण्यास इच्छुक आहे | नमुद ठिकाणनुसार अंदाजे किती रक्कमेपर्यंत घेण्यास इच्छुक आहेत. | अपेक्षित सोई-सुविधा (Amenities) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पोशि/५२१ ए.बी. पाटील | कुळगाव | ९५९४ ५६७८ ९० | टिटवाळा | **गृहनिर्माण संस्थेमार्फत** | ६२५ चौ.फुट. | ४० लाखा पर्यंत | लिफ्ट उद्यान जिम पुरेशी वाहतूक व्यवस्था |

**पर्याय क्र.२ करीता उदाहरण स्वरुप खालीलप्रमाणे भरलेला फॉर्म .**

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव व हुद्दा | नेमणूक | मोबईल क्रमांक | कोणत्या ठिकाणी घर घेण्यास इच्छुक आहेत. | गृहनिर्माण संस्थेमार्फत अथवा बिल्डरमार्फत तयार घेण्यास इच्छुक | अंदाजे किती चौ.फुटांचे घर घेण्यास इच्छुक आहे | नमुद ठिकाणनुसार अंदाजे किती रक्कमेपर्यंत घेण्यास इच्छुक आहेत. | अपेक्षित सोई-सुविधा (Amenities) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पोशि/५२१ ए.बी. पाटील | कुळगाव | ९५९४५ ६७८९० | टिटवाळा | **बिल्डर मार्फत** | ६२५ चौ.फुट. | ४० लाखा पर्यंत | लिफ्ट उद्यान जिम पुरेशी वाहतूक व्यवस्था |

सदर नियोजित ठाणे ग्रामीण पोलीस कर्मचारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याच्या कामासाठी व पुढील सर्व प्रक्रिसा पार पाडण्यासाठी पोलीस उप-अधीक्षक(मुख्या.) हे नोडल अधिकारी म्हणून राहतील. त्यांना पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा व ठाणे ग्रामीण कार्यालयात इमारत लिपीक मदत करतील. तसेचउविभागीय पोलीस अधिकारी मिरारोड/शहापूर येथील संबंधित लिपीक मदत करतील. सदरचे परिपत्रक दररोज हजेरीवर सतत ३ दिवस वाचून दाखवावे.

तसेच पोलीस ठाणे/शाखेच्या दर्शनी भागावर सर्व पोलीस कर्मचा-यांना दिसेल अशा ठिकाणी लावावे. सदर योजनेत जास्तीत जास्त कर्मचारी सहभाग घेतील याबाबत प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे यांनी सत्वर प्रयत्न करावेत.

13/10/17

( प्रशांत कदम )
अपर पोलीस अधीक्षक
ठाणे ग्रामीण

प्रति,

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, ठाणे ग्रामीण
पोनि/स्थागुशा/जिविशा/सुरक्षा/आगुशा/कल्याण/नियंत्रण कक्ष
पोनि बिनतारी संदेश/रापोनि मुख्यालय/ मोटार परिवहन विभाग,
प्रमुख लिपीक पत्रव्यवहार/आस्थापना/लेखा शाखा, ठाणे ग्रामीण

प्रत-

अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण
सर्वउपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणे ग्रामीण
पोलीसउप-अधीक्षक(मुख्या.) , ठाणे ग्रामीण